महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०१३-२०१४

### मराठी भाषा विभाग

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०१३-२०१४

### मराठी भाषा विभाग

एच ४१८७-१

# अनुक्रमणिका



| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना .. .. .. | १ |
| २ | मराठी भाषा विभाग .. .. .. | २ |
| ३ | भाषा संचालनालय .. .. .. | ५ |
| ४ | राज्य मराठी विकास संस्था .. .. .. | १० |
| ५ | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. . .. .. | १६ |
| ६ | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. . .. .. | २२ |

# कार्यक्रम क्रमांक १

## प्रस्तावना

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये "मराठी भाषा विभाग" असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१०/१०८/१८ (र. व का.), दिनांक २९ नोव्हेंबर २०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन कार्य अनुसूचीमधील सामान्य प्रशासन विभाग आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या अखत्यारित असलेले मराठी भाषेशी संबंधित विषय तसेच मराठी भाषाविषयक कामकाज हाताळणारी खालील कार्यालये/संस्था/मंडळे, नवनिर्मित मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आली आहेत:—

(क) भाषा संचालनालय,

(ख) राज्य मराठी विकास संस्था,

(ग) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि

(घ) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

२. मराठी भाषा विभाग लवकर कार्यान्वित होण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १३ ऑगस्ट २०१० व दिनांक ६ सप्टेंबर २०११ च्या बैठकीत निश्चित केल्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पदनि २०१०/प्र.क्र.१६९/१०/ २०-ब, दिनांक ३१ जानेवारी २०११ आणि शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, क्रमांक पदनि २०११/प्र.क्र.९३/ ११/आस्था-१, दिनांक ४ ऑक्टोबर २०११ अन्वये अनुक्रमे ३५ व १० पदांच्या निर्मितीस शासन मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय, मराठी भाषा विभाग क्रमांक पदनि २०११/प्र.क्र.९३/११/ आस्था-१, दिनांक २७ एप्रिल २०१२ अन्वये ८ पदांच्या निर्मितीस शासन मान्यता देण्यात आली आहे. सध्या या विभागास एकूण ५३ मंजूर पदे आहेत.

**३. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी समिती**

मराठी भाषा विभागांतर्गत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या निकषानुसार प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यासाठी व त्याचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधक यांची एक समिती दिनांक १० जानेवारी २०१२ च्या शासन निर्णयानुसार गठित केली आहे. याबाबतचा समृद्ध असा प्रस्ताव संपूर्ण पुराव्यानिशी तयार करून तो केंद्र शासनास सादर करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात माहिती तपासण्याचे काम जलद गतीने सुरू असून समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याची आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात येणार आहे.

४. राज्यातील न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने केंद्रीय व राज्य अधिनियमांचा मराठी अनुवाद प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यमान कायद्याचा मराठी अनुवाद अधिक अचूक व एकरूप होण्याच्या दृष्टीने विधि अनुवाद व सल्लागार समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ७ ऑगस्ट २००४ अन्वये दिनांक १ एप्रिल २००४ पासून कायमस्वरूपी मुदतवाढ देण्यात आली आहे.

५. मराठी भाषेचा विकास व धोरण ठरविण्यासाठी तसेच वेळोवेळी आढावा घेऊन मराठी भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे कार्यक्रम आखून मार्गदर्शन करण्यासाठी, भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेले विविध परिभाषा कोश अद्ययावत करणे इत्यादी करीता भाषा सल्लागार समितीची स्थापना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भासस-२०१०/प्र.क्र.७४/२० ब, दिनांक २२ जून २०१० अन्वये करण्यात आली आहे.

कर्मचारी विषयक गोषवारा

Personnel Summary

# मराठी भाषा विभाग

## Marathi Language Department

| अनुक्रमांक (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी (३) | पदांची संख्या (४) | Designation (५) |
|---|---|---|---|---|
| **अ** | **राजपत्रित** | | | (A) Gazzeted |
| १ | सचिव | संवर्ग पद | १ | Secretary |
| २ | उप सचिव | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | १ | Deputy Secretary |
| ३ | अवर सचिव | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | ३ | Under Secretary |
| ४ | कक्ष अधिकारी | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० | ८ | Desk Officer |
| | | एकूण | १३ | Total |
| **ब** | **अराजपत्रित** | | | (B) Non-Gazzeted |
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | ३ | Stenographer (H.G.) |
| २ | सहायक | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | १० | Assistant |
| ३ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | २ | Stenographer (L.G.) |
| ४ | लिपिक-टंकलेखक | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १२ | Clerk-Typist |
| ५ | वाहन चालक | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | २ | Driver |
| | | एकूण | २९ | Total |
| **क** | **अराजपत्रित (वर्ग-४)** | | | (C) Non-Gazzeted (Cl. IV) |
| १ | शिपाई | रु. ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | ११ | Peon |
| | | एकूण | ११ | Total |
| | | एकूण (अ+ब+क) | ५३ | Grand Total (A+B+C) |

# कार्यक्रम क्रमांक ३

## भाषा संचालनालय

१. शासन व्यवहारात मराठीचा वापर या शासनाच्या प्रतिज्ञाबद्ध धोरणाची अंमलबजावणी जास्तीतजास्त काटेकोरपणे होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेचे काम मुख्यतः भाषा संचालनालयाचे असून त्यासाठी हे संचालनालय खालील प्रकारची कामे पार पाडते :—

(१) विधानसभा विधेयके, विधानपरिषद विधेयके, अध्यादेश आणि सर्व राज्य अधिनियम व त्याखालील तयार केलेले नियम, उपनियम, उपविधि यांचा मराठी व हिंदी मधून अनुवाद करणे, अनुवादित अधिनियम अद्ययावत करणे, तसेच ती पुस्तकरुपात छापून प्रकाशित करणे.

(२) अर्थसंकल्पविषयक सर्व प्रकाशनांचा, राज्यपालांच्या अभिभाषणाचा, शासनाने नियुक्त केलेल्या विविध समित्यांच्या व आयोगांच्या अहवालांचा तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ६ इंग्रजी अहवालांचा मराठी अनुवाद करून देणे.

(३) विभागीय नियमपुस्तिका आणि सर्वसाधारण तसेच विशेष प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचा मराठी अनुवाद करून देणे.

(४) विद्यापीठीय स्तरावरील अभ्यासक्रम मराठीतून शिकविण्यासाठी उपयोगी ठरणा-या प्रशासनिक, विधिविषयक, तंत्रविषयक व विज्ञानविषयक परिभाषा शब्दकोश तयार करणे.

(५) सर्व केंद्रीय अधिनियमांचा व त्याखालील नियमांचा मराठीत अनुवाद करणे, त्यास राजभाषा खंड, नवी दिल्ली यांची संमती घेऊन तो अधिकृत मराठी पाठ भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे **भारत सरकारच्या राजपत्रात** प्रसिद्ध करणे, आणि मराठीतील प्राधिकृत पाठ म्हणून पुस्तकरूपात प्रसिद्ध करणे, न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने १९६० पासूनच्या राज्य अधिनियमांना सर्व सुधारणांसह अधिकृत स्वरुप देऊन ते अद्ययावत करणे.

(६) महत्त्वाचे शासकीय आदेश, अधिसूचना, अधिनियम आणि नियम यांचा अल्पसंख्याक भाषेतून अनुवाद करणे. त्यासाठी मुंबई (नवी मुंबई), पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार ठिकाणी विभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. सध्या फक्त हिंदी भाषेतून अनुवाद करून देण्याची सुविधा उपलब्ध असून ही कामे भाषा संचालनालय, मुंबई या कार्यालयामध्ये करण्यात येतात.

(७) शासकीय कार्यालयातील अमराठी भाषिक **राजपत्रित** अधिकारी व **अराजपत्रित** कर्मचारी यांच्यासाठी मराठी भाषा परीक्षा, तसेच सर्वांसाठी हिंदी भाषा परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करण्यात येतात. शासकीय सेवेतील इंग्रजी टंकलेखक, लघुलेखक तसेच लघु-टंकलेखक यांच्यासाठीही एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करण्यात येतात.

(८) शासकीय कार्यालयातून दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर होतो किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग, वेगवेगळी महामंडळे, जिल्हा व विभागीय स्तरावरील शासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा व जिल्हा ग्रामीण यंत्रणा यांच्या कार्यालयाची प्रत्यक्ष तपासणी करणे व त्यांच्या अडीअडचणी असल्यास त्या दूर करणे.

२. भाषा संचालनालयाने आतापर्यंत पदनाम कोश, प्रशासनिक लेखन, प्रशासन वाक्यप्रयोग, शासन व्यवहार कोश, कार्यदर्शिका आणि शासकीय कर्मचा-यांना तसेच इतरांना मराठी लेखनात मार्गदर्शन करण्यासाठी शुद्ध लेखन नियमावली तसेच राज्यशास्त्र, लोक प्रशासन, अर्थशास्त्र, साहित्य समीक्षा, धातुशास्त्र, औषधशास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन, ग्रंथालयशास्त्र (सुधारित), रसायनशास्त्र (सुधारित), संख्याशास्त्र, गणितशास्त्र (सुधारित), विकृतिशास्त्र, भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या,

शासन व्यवहारात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर यासंदर्भात शासकीय कार्यालयांची तपासणी करण्याचे काम या कार्यालयामार्फत करण्यात येत असून आतापर्यंत ७०२ कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. पुढील वर्षात (२०१३-१४) मध्ये किमान २० ते २५ शासकीय कार्यालयांची तपासणी करण्यात येईल, असे अपेक्षित आहे. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मभावा-१०९१/१२८-२०-ब, दिनांक ६ सप्टेंबर १९९१ अन्वये केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्री कार्यक्रमानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयांतून प्राधिकरणे व कंपन्या, तसेच राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखांमधून जनतेच्या माहितीसाठी लावण्यात येणारे नामफलक, सूचनाफलक यांवर हिंदी व इंग्रजीप्रमाणेच मराठी भाषेचा वापर होतो किंवा नाही, यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयांकडून वेळोवेळी पाहणी होते किंवा नाही याबाबत तपासणी करण्याचे प्राधिकार भाषा संचालकांना देण्यात आले असून त्यासंबंधात करावयाचा पत्रव्यवहार या कार्यालयामार्फत करण्यात येतो. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक मभावा-१०९२/४७७/प्र.४६/९२/२०-ब, दिनांक १७ नोव्हेंबर, १९९२ अन्वये शासनाच्या मराठीकरणाच्या धोरणानुसार शासन अंगिकृत व्यवसाय, मंडळे, महामंडळे यांमध्ये मराठी भाषेचा काटेकोरपणे वापर केला जातो किंवा नाही याची तपासणी करण्याचे काम भाषा संचालकांकडे सोपवण्यात आले आहे. त्यानुसार ६३ मंडळे/महामंडळांची तपासणी करण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मभावा-१०९४/१३३५/प्र.क्र.५८-९४/२०-ब, दिनांक १८ जानेवारी १९९५ अन्वये मंत्रालयीन विभागांचीही शासन व्यवहारात मराठीच्या वापरासंबंधी तपासणी करण्याचे काम भाषा संचालकांकडे सोपविले आहे. त्यानुसार आतापर्यंत सात मंत्रालयीन विभागांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या क्रमांक जीइएन-१०९५/८३३/नवि-२७, दिनांक २४ जानेवारी, १९९६ च्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील महापालिका व नगरपालिका कार्यालयामध्ये राजभाषा मराठीचा वापर होत आहे किंवा नाही हे तपासणी करण्याची जबाबदारी भाषा संचालकांकडे सोपवली आहे व कक्ष अधिकारी कामकाजात मराठी भाषा वापरासंबंधीच्या आदेशाची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येते किंवा नाही हे तपासणी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आतापर्यंत २ जिल्हा परिषदांची व १७ नगरपालिका कार्यालयांची तपासणी करण्यात आलेली आहे व पुढील वर्षी (२०१३-१४) मध्ये मंत्रालयीन विभाग, महानगरपालिका, मंडळे, महामंडळे अशा अंदाजे एकूण २० ते २५ कार्यालयांची तपासणी करण्यात येईल, असे अपेक्षित आहे.

दुय्यम न्यायालयात मराठीचा वापर करण्याबाबतच्या शासनाच्या २१ जुलै १९९८ च्या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व त्यासंबंधी पत्रव्यवहार केला जातो.

६. भाषा संचालनालयामार्फत २०१२-१३ या वर्षात भारताचे संविधान याच्या ७ व्या आवृत्तीचे अनुवादाचे काम करण्यात येत असून ही आवृत्ती इंग्रजी/मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे.

७. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.टंलेप्र-१०८१/सीआर/३४४/२०-ब, दिनांक ६ मे १९९१ अन्वये मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षेची सुधारित नियमावली अंमलात आलेली आहे. त्यानुसार शासकीय कार्यालयांतील सर्व इंग्रजी टंकलेखकांना ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा तसेच सर्व इंग्रजी लघुटंकलेखक/लघुलेखक यांना ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन व ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा आता सक्तीची केली आहे. या परीक्षांचे कामही या कार्यालयामार्फत नियमितपणे पार पाडण्यात येते.

८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक इएक्सएम-१०८०/१७, दि.१७ एप्रिल, १९८० अन्वये, सर्व विभागीय परीक्षा राजभाषा मराठीतून घेतल्या जातील असा निर्णय घेण्यात आला आहे. यास अनुसरुन भाषा संचालनालयाने या परीक्षांसाठी विहित केलेल्या नियमपुस्तिकांचा अनुवाद करण्याचे काम सुरू केलेले आहे.

भाषा संचालनालयाच्या अभिलेखानुसार त्यापैकी १९६ नियमपुस्तिकांचा अनुवाद झालेला असून तो संबंधित विभागांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. या नियमपुस्तिकांचे मुद्रण करण्याची जबाबदारी संबंधित विभागांकडे आहे.

## परिशिष्ट तीन

## भाषा संचालनालय (विभागीय कार्यालयासह)

| अ.क्र. | पदनाम Designation | वेतनश्रेणी (रुपये) Scale of Pay | पदसंख्या २०१२-२०१३ | पदसंख्या २०१३-२०१४ | पदनाम Designation |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) राजपत्रित पदे | | | | | Gazetted |
| १. | भाषा संचालक | १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | १ | १ | Director of Languages |
| २. | भाषा उप संचालक | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १ | १ | Dy. Director of Languages |
| ३. | विभागीय सहायक भाषा संचालक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | ३ | ३ | Divisional Assistant Director of Languages |
| ४. | सहायक भाषा संचालक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | ६ | ६ | Asstt.Director of Languages |
| ५. | भाषा अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | २ | २ | Language Officers |
| | | एकूण | १३ | १३ | **Total Gazetted..(A)** |
| (२) अराजपत्रित वर्ग-३ ची पदे | | | | | **Non-Gazetted (Class III)** |
| ६. | मराठी लघुलेखक (उच्चश्रेणी) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | १ | १ | Marathi Stenographer (H.G.) |
| ७. | पर्यवेक्षक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | १० | १० | Superviser |
| ८. | अधीक्षक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | ७ | ७ | Superintendent |
| ९. | अनुवादक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | ४६ | ४६ | Translator |
| १०. | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | १० | १० | Senior Clerk |
| ११. | मराठी लघुटंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | २ | २ | Steno-typist (Marathi) |
| १२. | लिपिक-टंकलेखक(मराठी) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १७ | १७ | Clerk-typist (Marathi) |
| १३. | मराठी टंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे २२०० | १ | १ | Marathi Typist |
| १४. | लिपिक-टंकलेखक(इंग्रजी) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १ | १ | Clerk-typist (English) |
| १५. | रोखपाल | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १ | १ | Cashier |
| १६. | कनिष्ठ ग्रंथपाल | ५२००-२०२०० ग्रेड पे २२०० | १ | १ | Junior Librarian |
| १७. | वाहनचालक | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | २ | २ | Driver |
| | | | ९९ | ९९ | **Total Class..III (B)** |
| (क) अराजपत्रित वर्ग-४ ची पदे | | | | | **Non-Gazetted (Class III)** |
| १८. | नाईक | ४४४०-७४४० ग्रेड पे १६०० | २ | २ | Naik |
| १९. | चपराशी | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | १८ | १८ | Peon |
| | | | २० | २० | **Total (Class. IV).. (C)** |
| | | एकूण (अ + ब + क) | १३२ | १३२ | **Grand Total (A+B+C)** |

७. 'मराठीतील कोशवाङ्मयः वस्तुस्थिती आणि अपेक्षा' - स. गं. मालशे संशोधन केंद्र, एस.एन. डी.टी. महिला विद्यापीठ व मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने (मुंबई - दिनांक ८ व २१ सप्टेंबर १९९६)

८. वैद्यकीय व्यवहारात मराठीचा वापर - इंडियन मेडिकल असोसिएशन व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या सहकार्याने (मुंबई).

९. उच्च माध्यमिक मराठीच्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांचा पुनर्विचार करण्यासाठी संबंधित शिक्षकांचे चर्चासत्र - वझे महाविद्यालय, मुलुंड यांच्या सहकार्याने. (मुंबई-१ एप्रिल २००१).

१०. 'भाषांतरकारांचे संमेलन' - कलासक्त व सृष्टी सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान, पुणे यांच्या सहकार्याने (पुणे- दिनांक १ मे २००३).

११. 'मराठीतील विज्ञानसाहित्य' - तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने (पुणे दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २००४).

१२. 'भाषांतर : स्वरूप आणि प्रक्रिया' - एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे यांच्या सहकार्याने (पुणे दिनांक १३ व १४ डिसेंबर २००४).

१३. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांमधील मराठी विषयाची दुरावस्था : कारणे आणि उपाय - मराठी विभाग, पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने (पुणे दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २००५).

१४. 'आंतरराष्ट्रीय शांततावर्षात उफाळलेली हिंसा' (व्याख्याने आणि चर्चा) - समाजमानस यांच्या सहकार्याने (कोल्हापूर - १० डिसेंबर २००७).

१५. 'मराठी प्रमाण भाषेचे लेखन' : एक नवविचार-मॉर्डन महाविद्यालय, पुणे यांच्या सहकार्याने (पुणे-दिनांक २० व २१ फेब्रुवारी २००८).

१६. 'अध्यापन एक आनंदयात्रा'-शिक्षणमंडळ, गोरेगाव यांच्या सहकार्याने (मुंबई २००८).

१७. 'महाराष्ट्रातील (विशेषतःमराठवाड्यातील) मराठी साहित्य' मराठी साहित्य परिषद, हैदराबाद यांच्या सहकार्याने (हैदराबाद - दिनांक २९ व ३० मार्च २००८).

१८. 'भाषाविज्ञान संशोधन पद्धती' - राज्यस्तरीय चर्चासत्र मराठी विभाग पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने (पुणे - दिनांक २९ व ३० डिसेंबर २००८).

१९.' शताब्दी स्मरण चर्चासत्र' (बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, ना. घ. देशपांडे, बा. भ. बोरकर यांच्या कवितेच्या संदर्भात) मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने (मुंबई दिनांक ११ व १२ जानेवारी २०१०).

२०.' क्रमिक पुस्तकांतील मराठी आणि मराठीचे अभ्यासक्रम - मराठवाडा साहित्य परिषद. औरंगाबाद यांच्या सहकार्याने (औरंगाबाद, दिनाक २९ ऑक्टोबर २०१२ ते २ नोव्हेबर २०१२).

**सर्वेक्षणे:**

१. 'अमराठी शाळांतील मराठीचे अध्यापन' या विषयावर मुंबईतील शाळांमधून सर्वेक्षण. (एप्रिल, १९९४).

२. 'महाराष्ट्राचा भाषिक नकाशा' तयार करण्याची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रातील काही शहरे व गावे निवडून केलेले एक चाचणी सर्वेक्षण. (जून, १९९५).

सूचीचे खंड ३ ते ५ संस्थेने प्रकाशित केले आहेत. त्याचे संपादन श्री. शरद साठे ह्यांनी केले आहे. १९७८ ते २००० ह्या कालखंडात प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथाच्या सूचीचे काम संस्थेत सुरू आहे. या सूचीत त्या-त्या कालखंडांत प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांची विषयवार सूची देण्यात आली असून एखाद्या विषयावर कोणते ग्रंथ मराठीत उपलब्ध आहेत याची माहिती मिळवण्यासाठी या सूचीचा अभ्यासकांना उपयोग होतो.

९. **मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची** : संपादक - डॉ. वसंत विष्णू कुलकर्णी - इ.स. १८०० ते २०३३ या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या मराठी भाषेतील सर्व तसेच मराठीची दखल घेणा-या अन्य भाषांतील कोश व इतर संदर्भसाधनांची तपशीलवार माहिती देणारी संदर्भसूची.

१०. **वस्त्रनिर्मिती-माहितीकोश** : राज्य मराठी विकास संस्था व इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम टेक्निकल इन्स्टिट्यूट या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने होणा-या ह्या प्रकल्पांतर्गत वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड १ ते ३ प्रकाशित झाले असून ४ था खंडही लवकरच पूर्ण होऊन मुद्रित होणार आहे. ह्या कोशात वस्त्रनिर्मितीतील विविध प्रक्रिया आणि संकल्पना उलगडून दाखविण्यात आल्या आहेत.

**इतर उपक्रम :**

१. **इतर राज्यांतील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत व इतर मराठी मंडळांना पुस्तके पाठवणे** : या प्रकल्पांतर्गत दरवर्षी अहमदाबाद येथील महाराष्ट्र मंडळाच्या ३ शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सकाळ आणि लोकसत्ता ही वर्तमानपत्रे पुरविण्यात येतात. तसेच हैद्राबाद येथील मराठी शाळेतील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना १ ली ते १० वी पर्यंतची मराठी पाठ्यपुस्तके पाठविण्यात येतात.

२. **पुस्तक प्रदर्शन** : दरवर्षी शासकीय प्रकाशनाचे प्रदर्शन संस्था स्वतंत्रपणे भरवीत असते. तसेच इतरत्र आमंत्रित केलेल्या प्रदर्शनांमध्ये संस्थेचा सहभाग असतो.

३. **मराठी संकेतस्थळांची स्पर्धा** : अलिकडे संगणकावर मराठीतून माहितीची देवाण-घेवाण करण्याचे प्रमाण वाढले आहे. शासनातील विविध विभागांकडे असणारी माहिती लोकांना सहज उपलब्ध व्हावी ह्यासाठी प्रयत्न होत आहेत. कला, क्रीडा, संस्कृती, विज्ञान, अर्थव्यवहार अशा विविध विषयांवरील माहिती आज मराठीतून संगणकावर उपलब्ध होऊ लागली आहे. ह्या व्यवहाराला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राज्य मराठी विकास संस्था, संकेतस्थळांची स्पर्धा आयोजित करत असते. २००६, २०१०, २०१२, २०१३ ह्या वर्षी संस्थेने अशा मराठी संकेतस्थळांच्या स्पर्धा आयोजित केल्या.

**संस्थेत सुरू असलेले उल्लेखनीय प्रकल्प :**

१. **दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची** : मराठी साहित्यातील दलित व ग्रामीण साहित्य प्रवाहातील साहित्यकृतीतील अपरिचित शब्द, म्हणी, वाक्प्रचार, विधी, रूढी यांचा कोश करण्याचा प्रकल्प संस्थेत ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या प्रमुख संपादकत्वाखाली सुरू असून महाराष्ट्राच्या विविध विभागातील भाषा व साहित्याचे अभ्यासक व समीक्षक यांत तज्ज्ञ या नात्याने कार्यरत आहेत.

२. **दलित-ग्रामीण-साहित्य-संस्कृती-कोश** : दलित आणि ग्रामीण साहित्यामधून आलेल्या विधी, प्रथा, रुढी, परंपरा संकेत, श्रद्धा, समज ह्यांची माहिती देणारा कोश तयार करण्याचे काम संस्थेत सुरू आहे.

३. **विज्ञानविषयक लोकलक्ष्यी पुस्तकांची मराठी भाषांतरे** : विज्ञानप्रसार, दिल्ली ह्या संस्थेच्या विज्ञानविषयक लोकलक्ष्यी अशा ५ पुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याचे काम राज्य मराठी विकास संस्था आणि मराठी विज्ञान परिषद ह्यांच्या संयुक्त प्रकल्पांतर्गत चालले आहे.

४. **मराठी उत्तमोत्तम साहित्यकृतींच्या ऑडियो सीडीज (Talk Books)** : मराठीतील राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त साहित्यकृतींपैकी निवडक अशा काही कलाकृती त्याप्रमाणे संत वाङ्मय श्राव्य पुस्तकांच्या स्वरुपात जतन करण्याच्या हेतूने राज्य मराठी विकास संस्थेने एक महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रवासी पक्षी व रसयात्रा तसेच विंदा करंदीकर यांच्या 'संहिता' व 'आदिमाया' हे काव्यसंग्रह तसेच स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे आत्मचरित्र 'कृष्णाकाठ' व संत वाङ्मयातील 'दासबोध' याचे श्राव्यपुस्तकात रुपांतर करण्याचे काम पूर्ण झाले असून ही श्राव्य पुस्तके राज्य मराठी विकास सस्थेच्या संकेतस्थळावर जनतेस उपलब्ध करून क्षेत्रात आली आहेत. यापुढील काळात ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा तसेच पुरस्कार प्राप्त साहित्यकृतींचे श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

## कर्मचारीविषयक गोषवारा

## Personnel Summary

## राज्य मराठी विकास संस्था

*Rajya Marathi Vikas Sanstha*

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनश्रेणी Scale of Pay (रुपये) | | पदांची संख्या No. of Posts २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (3) | | (४) | | (५) |
| (अ) | **राजपत्रित** | | | | | (A) *Gazetted* |
| १ | संचालक | ३७४००-६७००० (ग्रेड पे ८७००) | .. | १ | १ | Director |
| २ | उप संचालक | ३७४००-६७००० (ग्रेड पे ८७००) | .. | १ | १ | Dy. Director |
| ३ | वरिष्ठ संशोधन सहायक | १५६००-३९१०० (ग्रेड पे ७६००) | .. | १ | १ | Senior Reasearch Assistant |
| ४ | प्रशासकीय अधिकारी | १५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००) | .. | १ | १ | Administrative Officer |
| ५ | कनिष्ठ संशोधन सहायक | १५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००) | .. | १ | १ | Junior Reasearch Assistant |
| | | एकूण | .. | ५ | ५ | Total |
| (ब) | **राजपत्रित** | | | | | (B) *Gazetted* |
| १ | लेखा अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००) | .. | १ | १ | Accounts Officer |
| २ | कार्यासन अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००) | .. | १ | १ | Desk Officer |
| | | एकूण | .. | २ | २ | Total |
| (क) | **अराजपत्रित** | | | | | (C) *Non Gazzetted* |
| १ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००) | .. | १ | १ | Stenographer (L.G) |
| २ | सहायक | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००) | .. | ३ | ३ | Assistant |
| ३ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० (ग्रेड पे १९००) | .. | २ | २ | Clerk-Typist |
| ४ | रोखपाल | ५२००-२०२०० (ग्रेड पे १९००) | .. | १ | १ | Cashier |
| ५ | वाहन चालक | ५२००-२०२०० (ग्रेड पे १९००) | .. | १ | १ | Driver |
| | | एकूण | .. | ८ | ८ | Total |
| (ड) | **अराजपत्रित वर्ग ४** | | | | | (D) *Non Gazetted Class IV* |
| १ | शिपाई | ४४००-७४४० (ग्रेड पे १३००) | .. | १ | १ | Peon |
| | | एकूण | .. | १ | १ | Total |
| | | एकूण बेरीज (अ+ब+क+ड) | .. | १६ | १६ | Grand Total (A+B+C+D) |

**(३) उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना—**

मराठीशिवाय अन्य भाषांमधील विविध विषयांवरील अभिजात वाङ्मयाच्या ग्रंथांनी जगातील वैचारिक साहित्यात मोलाची भर घातली आहे. अशा मौलिक व महत्त्वपूर्ण ग्रंथांची भाषांतरे मराठी भाषेत उपलब्ध करून द्यावी, हा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेअंतर्गत इंग्रजी, रशियन, फ्रेंच इत्यादी पाश्चात्य व संस्कृत, प्राकृत यांसारख्या भारतीय भाषांतून मंडळाने पुस्तके निवडली असून भाषांतरित पुस्तके मंडळाने प्रकाशित केली आहेत.

**(४) महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी ऐतिहासिक कागदपत्रांच्या संपादन/प्रकाशनाची योजना—**

या योजनेमध्ये महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी उपलब्ध नवीन साधने आणि साहित्य लक्षात घेऊन व अशा अद्ययावत साधनसामग्रीचा उपयोग करून आधुनिक इतिहास रचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राचा प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/प्रकाशित करण्याची ही योजना आहे.

प्रागैतिहासिक कालापासून ते आधुनिक कालापर्यंत साधारणतः प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडात म्हणजे (१) प्राचीन कालखंड, (२) मध्ययुगीन कालखंड, (३) मराठा कालखंड भाग-१ (शिवकाल), (४) मराठा कालखंड भाग-२ (पेशवेकाल) व (५) आधुनिक कालखंड प्रकाशित करण्यात येतील. यापैकी प्राचीन कालखंड भाग-१, मध्ययुगीन कालखंड भाग-१ (खंड १ व २), मराठा कालखंड भाग-१ (शिवकाल) व मराठा कालखंड भाग-२, (पेशवेकाल) हे खंड प्रकाशित झाले आहेत. आधुनिक कालखंडाच्या (सन १८१९ ते १९४७) आणि (सन १९४८ ते २०१०) या खंडाच्या संपादनाचे काम करण्यासाठी या विषयांतील तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**(५) मंडळाची वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरूपाची अन्य प्रकाशने—**

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणतः जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकांस कमी किंमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या साहित्याचे पुनर्मुद्रण तसेच समाज परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तींची चरित्रे वगैरे या योजनेत प्रकाशित करण्यात येतात. संपूर्ण गडकरी भाग-१, महात्मा फुले समग्र वाङ्मय, लोकहितवादी समग्र वाङ्मय, आगरकर समग्र वाङ्मय खंड १ ते ३, आचार्य भागवतांचे संकलित वाङ्मय, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय खंड १ ते ५, सांस्कृतिक महाराष्ट्र खंड १ व २, केशवसुतांची कविता (हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती) नामदेव गाथा, भावार्थ रामायण, संत तुकाराम बावांची गाथा (१९५० मध्ये प्रकाशित केलेली) अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**(६) ललितेतर वाङ्मय**

या योजनेअंतर्गत मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयावरील ग्रंथांची उणीव लक्षात घेऊन लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील संशोधन व वैशिष्ट्यपूर्ण अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**(७) नवलेखकांना प्रोत्साहन**

या योजनेअंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा लेखकांना कथा, कादंबरी, ललित गद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते.

नवलेखक अनुदान याअंतर्गत

- ❖ यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार
- ❖ नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा

■ **यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजना—**नवलेखक अनुदान योजनेत प्रकाशित पुस्तकांपैकी उत्कृष्ट पुस्तकांची निवड करून त्यांना यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार काव्य, कथा, कादंबरी, नाट्य एकांकिका, ललितगद्य, बालवाङ्मय या सहा प्रकारात दिला जातो. आजपर्यंत १४५ पुस्तकांना यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार देण्यात आले आहेत. तसेच उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी प्रकाशकांना सरफोजीराजे भोसले पुरस्कार दिला जातो. आतापर्यंत ८ प्रकाशकांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

■ नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. आजपावेतो ६० चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**(८) साहित्य संस्थांना अनुदान—**

(१) मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी अनुदान योजनेतंर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी.—

जनतेला आधुनिक ज्ञान, विज्ञान संकल्पना उपलब्ध व्हाव्यात या हेतूने विज्ञान व तंत्रज्ञान कोश प्रसिद्ध करण्याचा मंडळाने निर्णय घेतला. या कोशाच्या संपादनाचे काम ख्यातनाम वैज्ञानिक संस्था, मराठी विज्ञान परिषद, मुंबई या संस्थेकडे सोपविले. हा कोश प्रकाशित झाला असून या कोशास वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. सर्वशिक्षा अभियान अंतर्गत योजनेखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत या कोशाचे मोठ्या प्रमाणात वितरण करण्यात आले.

**(४) मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास—**

मराठी नाटक आणि रंगभूमीचा अद्ययावत इतिहास ग्रंथरुपाने मराठी भाषेत उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्यामुळे हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. पुस्तकाच्या संपादनाचे काम प्रा. दत्ता भगत यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

**(५) मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास—**

भारतीय चित्रपटसृष्टीला मराठी चित्रपटांनी समृद्ध आणि संपन्न केले आहे. भारतीय चित्रपटांच्या इतिहासात मराठी चित्रपटांनी बजावलेली महत्वपूर्ण कामगिरी लक्षात घेऊन मराठी चित्रपटांचा समग्र इतिहास ग्रंथरुपाने देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा प्रकल्प ज्येष्ठ चित्रपट समिक्षिका आणि अभ्यासक रेखा देशपांडे यांच्याकडे सोपविला आहे.

**(४) संकल्पित योजना—**

राज्याच्या सांस्कृतिक धोरणानुसार राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने पुढील योजना कार्यान्वित करण्याचे संकल्पित करण्यात आले आहे.

(१) एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभापासून आतापर्यंत महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास

(२) अन्य साहित्य संमेलन अनुदान

(३) मराठी शब्द व्युत्पत्ती कोश

(४) दुर्मिळ मराठी ग्रंथांची सूची तयार करून ते ग्रंथ संकेतस्थळावर उपलब्ध करणे

(५) थोर व्यक्तींची संक्षिप्त चरित्रे

(६) महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि महाराष्ट्राबाहेरील महत्त्वाच्या शहरांमध्ये ग्रंथोत्सवाचे आयोजन.

(७) ग्रंथसंस्कृती जोपासण्यासाठी महिन्यातून एक दोनदा ग्रंथचर्चा, ग्रंथसमीक्षण, साहित्यविषयक चर्चा अशा उपक्रमांचे आयोजन.

(८) महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संदर्भात कार्य करणा-या संस्थांना अर्थसहाय्य.

(९) संतवचनाचे अनुवाद

(१०) मराठी ग्रंथ अनुवाद प्रोत्साहन

(११) वचनकोश

(१२) नाट्यसंज्ञा कोश

(१३) खाद्यसंस्कृती कोश

(१४) अलंकार आणि वेशभूषा कोश

(१५) स्व. वसंतराव नाईक यांच्यावरील बृहदग्रंथ

(१६) मंडळाच्या दुर्मिळ ग्रंथांचे ई-बुक

(१७) शब्दकोश आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान कोशाची इंटरॲक्टीव्ह सीडी

(१८) १९६० ते २०१० या पन्नास वर्षांच्या कालावधीतील महत्त्वाच्या साहित्यिकांचा संक्षिप्त परिचय करून देणारा दोन खंडातील प्रकल्प.

(१९) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

## आस्थापनाविषयी माहितीचा संक्षिप्त तक्ता
## साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या एकूण पदसंख्येचा तक्ता

| अ.क्र. (१) | वर्ग (२) | पदसंख्या (३) | एकूण (४) |
|---|---|---|---|
| १ | अ | १ | १ |
| २ | ब | .. | .. |
| ३ | क | १८ | १८ |
| ४ | ड | २ | २ |
| | एकूण | २१ | २१ |

## सन २०१२-१३ मधील पदसंख्येचा तक्ता

| अ. क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी (रुपये) (३) | ग्रेड वेतन रुपये (४) | पदसंख्या (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित** | | | | |
| १ | सचिव | १५६००-३९१०० | ६६०० | १ |
| | | | एकूण ... | १ |
| **(ब) अराजपत्रित (वर्ग-३)** | | | | |
| २ | अधीक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ३ | रीडर | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ४ | सहायक लेखाधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ५ | उच्च श्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४४०० | १ |
| ६ | अध्यक्षांचे स्वीय सहायक (निम्नश्रेणी लघुलेखक) | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ७ | टिप्पणी सहायक | ५२००-२०२०० | २४०० | २ |
| ८ | प्रकाशन सहायक | ५२००-२०२०० | २४०० | १ |
| ९ | सहायक | ५२००-२०२०० | २४०० | १ |
| १० | ग्रंथालयीन सहायक | ५२००-२०२०० | २००० | १ |
| ११ | रोखपाल | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| १२ | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| १३ | लिपिक-टंकलेखक (मराठी) | ५२००-२०२०० | १९०० | ३ |
| १४ | टंकलेखक (मराठी) | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| १५ | लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| १६ | वाहन चालक | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| | | | एकूण ... | १८ |
| **(क) अराजपत्रित (वर्ग-४ )** | | | | |
| १७ | शिपाई | ४४४०-७४४० | १३०० | २ |
| | | | एकूण ... | २ |
| | | | (अ + ब + क) एकूण ... | २१ |

(शा.म.मु.) एच ४१२९-४ (६५५-०३-२०१३)

**२) मराठी विश्वकोशाचे पुनर्मुद्रण**

मराठी विश्वकोशाच्या प्रकाशित खंड १ ते १८ पैकी खंड १ ते १४ खंडांच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रत्येकी १०,००० प्रती संपल्या असून खंड १,२,३,५ च्या दुसऱ्या आवृत्तीच्या ५००० प्रतीही संपण्याच्या मार्गावर आहेत. उर्वरित खंड ४ व ६ ते १४ चे पुनर्मुद्रणाचे काम शासकीय मुद्रणालयात सुरु आहे. मराठी विश्वकोशाच्या संपूर्ण संचाची मागणी ग्राहकांकडून एकाच वेळी मोठया प्रमाणावर होत असून त्याची पूर्तता करण्याचे प्रयत्न शासन स्तरावर सुरु आहेत.

**(३) विश्वकोशाची वेबसाईट** - आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन मराठी विश्वकोशाला इंटरनेटवर (महाजालकावर) आणण्याच्या दृष्टीने मंडळाने काम सुरु केले आहे. www.vishwakosh.org.in या वेबसाईटवर मराठी विश्वकोशाच्या १ ते १७ खंडांची सर्व नोंदसूची, वैभवी झरोका, मंडळाच्या आतापर्यंतच्या सर्व अध्यक्षांचा थोडक्यात परिचय, छायाचित्रदर्शन उपलब्ध करण्यात आले आहे.

कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-२ (भाग-१) मंडळाने प्रकाशित केला असून तोही वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**विश्वकोश निर्मिती मंडळाने मराठी विश्वकोशाचे आतापर्यंत प्रसिध्द केलेले खंड www.marathivishwakosh.in या संकेतस्थळावर घेण्याची योजना अंमलात आणण्यास सुरुवात केली आहे.** सर्व जगभर मराठी भाषेचा प्रसार व प्रचार व्हावा आणि जगभरातील मराठी भाषिकांना विश्वकोशातील माहिती मोफत महाजालकावर उपलब्ध व्हावी, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत मराठी विश्वकोशाचे १ ते १९ खंड महाजालकावर सीडॅकच्या सहकार्याने टाकण्यात आले आहेत.

**(४) विश्वकोश खंड १ ते १७ ची सीडी** :—वाचकांची दीर्घ कालावधीची मागणी विचारात घेऊन ज्ञानार्जन व लोकशिक्षणाच्या उद्देशाने सीडी स्वरुपात हे खंड वाचकांना मिळावेत, ते नेहमी जवळ ठेवता यावेत म्हणून मंडळाने १ ते १७ खंडांमधील संपूर्ण माहिती सहा सीडींच्या संचामध्ये समाविष्ट केली आहे. ई बुक स्वरुपात असलेल्या या सीडीमध्ये २०,१८२ पृष्ठे आणि ९५२ चित्रपत्रे समाविष्ट केलेली आहेत. या सीडी संचाचे मूल्य रु.१०००/- असून हा संच सवलतीच्या दरात रु.७००/-ला उपलब्ध आहे.

**(५) ब्रेल लिपितील विश्वकोश :—** अंध वाचकांनाही कुमार विश्वकोशाची माहिती उपलब्ध व्हावी यासाठी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड या संस्थेच्या सहकार्याने वाचकांच्या मागणीनुसार ब्रेल लिपितील कुमार विश्वकोश उपलब्ध करुन देण्यात येतील.

**(६) बोलका विश्वकोश :—** मराठी विश्वकोश हा सर्वच स्तरांतील वाचकांपर्यंत पोहोचावा म्हणून मंडळ नेहमी प्रयत्नशील आहे. अंध वाचकांनाही मराठी विश्वकोशाची माहिती व्हावी, त्यांच्या मनात आवड निर्माण व्हावी या हेतूने मंडळाने नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड या संस्थेच्या सहकार्याने, सतराव्या खंडातील काही निवडक नोंदी, याशिवाय माहितीवजा हृद्य आठवणी मान्यवरांच्या आवाजांमध्ये ऑडिओ सीडीच्या स्वरुपात बोलका विश्वकोश या नावाने प्रसिध्द केल्या आहेत.

**(७) बोलका कन्याकोश :—**बोलक्या कन्याकोशात महाराष्ट्रातील नामवंत कन्यांच्या नोंदी आहेत. बोलक्या विश्वकोशाच्या ३ सीडींचा संच असून त्या लवकरच विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत. १२ ते १७ वयोगटातल्या किशोरवयीन मुलींना ज्यांच्या परिचयातून, अल्पचरित्रातून स्फूर्ती मिळेल अशा महाराष्ट्र कन्यांचा बोलका कन्याकोश महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केला आहे. यात २७० महाराष्ट्र कन्यांचा अल्पपरिचय आहे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यापासून उत्तर ध्रुवावरुन उडी मारणाऱ्या शीतल महाजनपर्यंत अनेक क्षेत्रात घोडदौड करणाऱ्या महाराष्ट्र कन्यांचा परिचय यात आहे.

नॅबच्या सहकार्याने ही ध्वनीफित आकाराला आली आहे. सदर कोश महाराष्ट्र माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर आणि सावित्रिबाई फुले यांना अर्पण करण्यात आला आहे. सदर बोलक्या कन्याकोशाचे शीर्षगीत गौरी कुलकर्णी यांनी लिहिले असून नीलेश मोहरीर यांनी त्या गीताला चाल लावली आहे. तर ते गाईले आहे देवकी पंडित यांनी.

**(८) विश्वकोश राजस्पर्धा :—** ज्या लोकशिक्षणाच्या उद्देशाने शासनाने मराठी विश्वकोश रचना हाती घेतली तो हेतू सफल व्हावा, वाचनसंस्कृती वाढावी आणि मराठी विश्वकोशातील ज्ञानाचा समृध्द साठा प्रत्येक गावागावात, घराघरात पोहोचावा हयादृष्टीने मंडळाने वयाचे, शिक्षणाचे कोणतेही बंधन न ठेवता सर्वासाठी ही राजस्पर्धा खुली ठेवली आहे. महाराष्ट्रभर ही स्पर्धा अनेक ठिकाणी घेण्यात आली आहे आणि पुढेही ही स्पर्धा विश्वकोश प्रचाराच्या दृष्टीने ठिकठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे.

**(९) आपला विश्वकोश :—** विश्वकोशाबद्दल सामान्य जनांना माहिती व्हावी म्हणून २८ मिनिटांची एक ध्वनिचित्रफीत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केली आहे. विश्वकोश म्हणजे काय ? शब्दकोशापासून तो वेगळा कसा? विश्वकोशातील नोंदी म्हणजे काय? याबद्दलची माहिती या लघुपटात आहे. विश्वकोशाचे अभिमान गीत हे या

## कर्मचारी विषयक गोषवारा
## (अ) प्रशासकीय कार्यालय, मुंबई

| अ. क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी (रुपये) (३) | ग्रेड वेतन (४) | पदसंख्या (५) |
|---|---|---|---|---|
| **अ** | **राजपत्रित** | | | |
| १ | सचिव (स. रा. से. वर्ग १) विभाग प्रमुख | १५६००-३९१०० | ६६०० | १ |
| | | | एकूण ... | १ |
| | **अराजपत्रित** | | | |
| १ | अधीक्षक | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| २ | सहायक लेखाधिकारी | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ३ | कनिष्ठ लघुलेखक | ९३००-३४८०० | ४३०० | १ |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | १ |
| ५ | सहायक | ५२००-२०२०० | २४०० | १ |
| ६ | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० | १९०० | १ |
| | | | एकूण ... | ६ |
| | **अराजपत्रित (वर्ग-४)** | | | |
| १ | शिपाई | ४४००-७४४० | १३०० | २ |
| | | | एकूण (अ) ... | ९ |

**(ब) मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, जिल्हा सातारा**

| अ. क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी (रुपये) (३) | ग्रेड वेतन (४) | पदसंख्या (५) |
|---|---|---|---|---|
| | **राजपत्रित** | | | |
| १ | सहायक सचिव (स. रा. से. वर्ग २) | ९,३००-३४,८०० | ४४०० | १ |
| | | | एकूण ... | १ |
| | **ठोस मासिक मानधन** | | | |
| २ | विभाग संपादक | २१,००० | ... | २ |
| ३ | सह संपादक | १४,००० | ... | ३ |
| ४ | कला संपादक | ८,००० | ... | १ |
| ५ | प्रमुख चित्रकार | ७,५०० | ... | १ |
| ६ | प्रमुख मानचित्रकार | ८,४०० | ... | १ |
| ७ | सहायक मानचित्रकार | ६,४०० | ... | १ |
| ८ | संदर्भ सहायक | ५,८०० | ... | १ |
| | | | एकूण ... | १० |
| **अराजपत्रित, वर्ग-३** | | | | |
| ९ | विद्याव्यासंगी सहायक | ९,३००-३४,८०० | ४४०० | ८ |
| १० | संपादकीय सहायक | ५,२००-२०,२०० | २८०० | ७ |
| ११ | स्वीय सहायक | ९,३००-३४,८०० | ४३०० | १ |
| १२ | ग्रंथालयीन सहायक | ५,२००-२०,२०० | २००० | ३ |
| १३ | लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) | ५,२००-२०,२०० | १९०० | ६ |
| १४ | वाहन चालक | ५,२००-२०,२०० | १९०० | १ |
| | | | एकूण ... | २६ |
| **अराजपत्रित वर्ग-४** | | | | |
| १५ | शिपाई | ४,४४०-७४४० | १३०० | ४ |
| १६ | झाडूवाला-हमाल | ४,४४०-७४४० | १३०० | १ |
| | | | एकूण ... | ५ |
| | | | एकूण (ब) ... | ४२ |
| | | | एकूण (अ+ब) ... | ५१ पदे |

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**